# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in

क्रमांक:१५/अर्थस/ईबीसी-परिपत्रक/२०१४-१५/२३३

दिनांक : 23 MAR 2015

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती व नागपूर.

**विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विदयार्थ्याच्या** शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत...

संदर्भ :-१.या संचालनालयाचे पत्र क्र.१०/एनजीपी/आधारकार्ड/२०१४/५,दि. ८ जाने. २०१५.
२.या संचालनालयाचे पत्र क्र. १५/तंशिसं/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१४१५/२२३, दिनांक १३ मार्च २०१५.

उपरोक्त विषयास अनुसरुन खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थामधील ज्या अभ्यासक्रमाचे शुल्क हे "शिक्षण शुल्क समितीद्वारे" ठरविण्यांत येते अशा संस्थामधील केन्द्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर माहिती भरलेली आहे. प्रणालीमध्ये बँक खात्याची माहिती नोदविलेली आहे. तसेच आपल्या अधिपत्याखालील संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये ECS प्रणालीद्वारे रक्कम जमा करण्याकरीता (Core Banking सुविधा असलेल्या बँकेचे) विद्यार्थ्यांचे बँक खाते प्राप्त करुन बँक खात्याची पडताळणी सुदधा करणेबाबत उपरोक्त सदर्भ क्रं. २ दिनांक १३ मार्च २०१५ रोजीच्या पत्रानुसार कळविलेले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागातंर्गत महाविद्यालय/ संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांची आधारकार्डची नोंदणी माहे मार्च २०१५ पर्यंत पूर्ण करणेबाबत शासनाने निर्देश असल्याने संदर्भ क्र. १ दिनांक ८ जाने. २०१५ रोजीच्या पत्रानुसार आपल्या स्तरावरुन आपल्या अधिपत्याखालील संस्थांना सूचित करण्याबाबत कळविण्यांत आले आहे. आर्थिक मागास पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी करणे तसेच आधारकार्ड क्रमांक बँक खातेशी सलग्न/लिंक करणेबाबत विद्यार्थ्यांना सूचित करण्याबाबत संबंधीत संस्थांना आपल्या स्तरावरुन कळविण्यांत यावे. जेणे करुन लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट इबीसी रक्कम जमा करणेबाबतची कार्यवाही करणे सुलभ होईल.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ......2185......
दिनांक ...3-1 MAR...

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक , तंत्रशिक्षण म.रा.मुंबई

पृष्ठांकन/तंशिस/विकाना/शैवि/२०१४-१५/ 1005
दिनांक:- 3 1 MAR 2015

प्रति,

संचालक/प्राचार्य
खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्था,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका तसेच तत्सम संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार सर्व इबीसी धारक विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची पडताळणी व पात्र विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी करून आधारकार्ड क्रमांक बँक खात्याशी संलग्न करण्याबाबतची तात्काळ कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर